# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १४/०८/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १४/०८/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८, दि. ०८/०८/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ६. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ७. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १०. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ११. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| १३. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| १५. | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |

**मा. सभापती :-**

नविन अधिकाऱ्यांची ओळख करुन द्या. सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १४/०८/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८, दि. ०८/०८/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.नविन अधिकाऱ्यांनी आपली ओळख करुन द्यायची आहे.

**प्रशांत दळवी :-**

आजच्या मिटींगबाबत ठराव आहे. मा. आयुक्त सो. यांनी दि. १९/७/२०१४ रोजी सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने मंजूरी दिली असून सदर अंदाजपत्रकास मा. महासभा दि. १९/७/२०१४ रोजीच्या मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. परंतु मा. आयुक्त सो. ह्यांनी सदर ठरावास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये विखंडीत करण्याकरिता मा. राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पातील २०१४-१५ करिता जमाखर्चाच्या शिर्षाबाबत स्पष्टता व संभ्रम निर्माण झाले आहे. ह्यामुळे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकाबाबत स्पष्टीकरण होत नाही तोपर्यंत दि. १६/०८/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडतो.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**सभा तहकुब ठराव क्र. ५४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी दि. १९/०७/२०१४ रोजी सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने मंजुरी दिलेली असून सदर अंदाजपत्रकास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ च्या मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. परंतु मा. आयुक्त सो. यांनी सदर ठरावास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये विखंडीत करण्याकरिता मा. राज्यशासनाकडे पाठविलेला आहे. यामुळे अर्थसंकल्पातील सन २०१४-१५ करिता जमाखर्चाच्या शिर्षाबाबत स्पष्टता व संभ्रम निर्माण झालेला आहे.

यामुळे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत स्पष्टीकरण होत नाही. तोपर्यंत ही सभा दि. १६/०८/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी ११.२५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**